तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी § 22620601,22690602,22641150,22641151 फॅक्स -2269 2102/2269007.
E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/२०१६/ ४३२
दिनांक : 30 MAR 2016

प्रति,
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परीक्षा (CET) नसल्याबाबत

महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ , दिनांक १७.८.२०१५ मधील तरतूदीनुसार प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमासाठी अभियांत्रिकी/तंत्रज्ञान पदविकाधारक (Diploma) आणि बी.एस. सी.पदवी धारक (B.Sc.) हे उमेदवारही प्रवेशासाठी पात्र असल्याने प्रवेशोच्छुक उमेदवारांनी MHT-CET -२०१६ देणे अनिवार्य आहे अशा आशयाची अधिसूचना क्रमांक २अ/एडीएम/२०१५/३८९ दिनांक १८.३.२०१६ अन्वये संचालनालयाने प्रसिध्द केली आहे.

या अधिसूचनेमध्ये पदविकाधारक असलेले जे उमेदवार " प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी " अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छितात अशा उमेदवारांना सामायिक प्रवेश परीक्षा आवश्यक असल्याचे स्पष्ट नमूद करूनही काही वृत्तपत्रांतून " थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सामयिक प्रवेश परीक्षा अनिवार्य असल्याची " किंवा " थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया रद्द " झाल्याच्या बातम्या प्रसिध्द झाल्या आहेत. परिणामी पदविका अभ्यासक्रमामध्ये शिकत असलेल्या विद्यार्थी व पालकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या पार्श्वभूमीवर आपणास कळविण्यात येते की, थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी गत शैक्षणिक वर्षाप्रमाणेच प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार असून त्या प्रवेशासाठी कोणतीही सामायिक प्रवेश परीक्षा निर्धारीत केलेली नाही किंवा अनिवार्य केलेली नाही. सदर बाब आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदविका व पदवी अभ्यासक्रमांच्या

D:\Budage\२०१६-१७\General Correspondence\LETTER to ro for DSE DSP admissions.docx

सहसंचालक तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय, अमरावती
आवक क्र. 1996 दिनांक 6/4/16

संस्थांच्या निदर्शनास आणण्यात यावी. तसेच ही बाब संस्थेच्या नोटीस बोर्डवर प्रदर्शित करुन विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणण्याबाबतही सर्व संस्थांना कळविण्यात यावे. (सोबत प्रेस नोटची प्रत जोडली आहे). तसेच याबाबतीत स्थानिक स्तरावर वृत्तपत्रांकडे प्रेस नोट पाठवून जनजागृती करण्यात यावी.

या अनुषंगाने आपणास पुढे असेही कळविण्यात येते की, शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक मुसका-२०१६/१९२५१२/का.१ ,दिनांक २२.३.२०१६ अन्वये वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या शासनासंबंधीच्या बातम्यांवरील खुलाशाप्रकरणी करावयाची कार्यवाही स्पष्ट करण्यात आलेली आहे. त्या पार्श्वभूमीवर स्थानिक वृत्तपत्र व प्रसारमाध्यमांमध्ये संचालनालयाच्या अधिनस्त येणा-या व्यावसायिक पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियांच्या अनुषंगाने चुकीचे वृत्त प्रसिध्द झाल्यास त्यातील चुकीच्या / नकारात्मक बाबींचे त्वरीत खंडन करण्यात यावे,जेणेकरुन विद्यार्थी व पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण होणार नाही. अशा कार्यवाहीची माहिती संचालनालयास त्वरीत अवगत करण्यात यावी.

(डॉ.सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : कार्यासन क्रमांक ३ व १०,मुख्य कार्यालय मुंबई यांना माहितीसाठी

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी § 22620601,22690602,22641150,22641151 फॅक्स -2269 2102/2269007.

E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


दिनांक : ३०.३.२०१६

## प्रेस नोट

महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५, दिनांक १७.८.२०१५ अधिनियमानुसार तंत्रशिक्षणातील व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठीचे प्रवेश नियम व प्रवेश पात्रता शासनाने राजपत्राद्वारे दिनांक ११.३.२०१६ रोजी प्रसिध्द केले आहेत व ते संचालनालयाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध करण्यात आलेले आहेत. सदर प्रवेश नियम व प्रवेश पात्रतेनुसार थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व थेट द्वितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी पदविका अभ्यासक्रमाच्या गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल व प्रवेश देण्यात येतील.

या संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांपैकी थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी कोणतीही सामायिक प्रवेश परीक्षा (CET) निर्धारीत केलेली नाही किंवा अनिवार्य केलेली नाही.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

क्रमांक :- विकाअ (शिक्षण)/२०१६/४६१
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती
दिनांक :- 12 APR 2016

प्रति,
प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका संस्था यांना आवश्यक कार्यवाही साठी.

सहसंचालक तंत्रशिक्षण
विभागीय कार्यालय, अमरावती

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण वि.का., अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.